## (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८)

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५

## अनुक्रमणिका

उद्देशिका

| कलमे | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|

### प्रकरण एक

### प्रारंभिक


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ०१ |
| २. | व्याख्या. | ०१ |


### प्रकरण दोन

### महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण


| | | |
|---|---|---|
| ३. | प्राधिकरण स्थापन करणे व कायद्याने संस्थापित करणे. | ०४ |
| ४. | प्राधिकरणाचा अध्यक्ष, अन्य सदस्य व विशेष निमंत्रित यांच्या नियुक्तीसाठी अर्हता. | ०४ |
| ५. | निवड समिती गठित करणे व तिची कार्ये. | ०४ |
| ६. | प्राधिकरणाचा अध्यक्ष आणि सदस्य याचा पदावधी, वेतन व भत्ते आणि इतर सेवाशर्ती. | ०५ |
| ७. | सदस्यास काढून टाकणे. | ०६ |
| ८. | प्राधिकरणावर अधिकारी व कर्मचारी यांना प्रतिनियुक्त करण्याचे शासनाचे अधिकार व त्यांच्या सेवाशर्ती. | ०७ |
| ९. | प्राधिकरणाचे कामकाज. | ०७ |
| १०. | रिक्त जागा इत्यादीमुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे. | ०८ |

## अनुक्रमणिका--चालू


| कलमे | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण तीन** | |
| | **प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये** | |
| ११. | प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये. | ०८ |
| १२. | प्राधिकरणाची सर्वसाधारण धोरणे. | १२ |
| १३. | प्राधिकरणाचे अधिकार व विवाद सोडविणारा अधिकारी. | १३ |
| | **प्रकरण चार** | |
| | **राज्य जल नियोजन** | |
| १४. | नदी-खोरे अभिकरणाची परवानगी. | १३ |
| १५. | राज्य जल मंडळ. | १४ |
| १६. | राज्य जल परिषद. | १५ |
| | **प्रकरण पाच** | |
| | **लेखे, लेखापरीक्षा आणि अहवाल** | |
| १७. | प्राधिकरणाला अनुदान व आगाऊ रकमा देणे. | १६ |
| १८. | प्राधिकरणाचा अर्थसंकल्प. | १६ |
| १९. | प्राधिकरणाचे लेखे. | १६ |
| २०. | प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल. | १६ |
| | **प्रकरण सहा** | |
| | **राज्यपालांचे निदेशानुसार अनुशेष निर्मूलनार्थ विशेष तरतुदी** | |
| २१. | प्राधिकरणाची विशेष जबाबदारी. | १७ |

## अनुक्रमणिका--चालू


| कलमे | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण सात** | |
| | **संकीर्ण** | |
| २२. | विवाद व अपील. | १७ |
| २३. | शासनाकडून निदेश. | १८ |
| २४. | प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी आणि इतर कर्मचारी लोकसेवक असणे. | १८ |
| २५. | सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. | १८ |
| २६. | या अधिनियमाखालील आदेशांचे अनुपालन न करण्याबद्दल शिक्षा. | १८ |
| २७. | कंपन्यांनी केलेले अपराध. | १८ |
| २८. | अपराध आपसात मिटवणे. | १९ |
| २९. | अपराधाची दखल. | १९ |
| ३०. | नियम करण्याचा शासनाचा अधिकार. | १९ |
| ३१. | विनियम करण्याचा शासनाचा अधिकार. | १९ |
| ३२. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | २० |

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.

## [सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १८.]

[ मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ४ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्यासाठी, जलसंपत्तीचे कुशल, समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्यासाठी आणि त्याची सुनिश्चिती करण्यासाठी कृषिविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्याकरिता, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छपन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५" असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल आणि निरनिराळ्या क्षेत्रांकरिता आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या कलमांकरिता, वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

व्याख्या.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "एकूण मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क" याचा अर्थ, मोठ्या प्रमाणात पाण्याच्या हक्कदारीच्या संयुक्त व्यवस्थापनाच्या प्रयोजनाकरिता पाणी वापर संस्थांच्या गटास किंवा संघटनेस देण्यात आलेली एकूण हक्कदारी, असा आहे;

(ख) "वाटप" याचा अर्थ, प्रत्येक वर्षी किंवा प्रत्येक हंगामात विहित प्राधिकाऱ्याकडून घोषित करण्यात येणारा, त्या काळात नदीच्या उप खोऱ्यात, नदीच्या खोऱ्यात, प्रकल्पात किंवा पाणी साठवण्याच्या यंत्रणेत उपलब्ध असलेल्या पाण्याच्या आधारे, तसेच टंचाई किंवा आपद्ग्रस्त परिस्थितीत प्रमाणशीर पद्धतीच्या तत्त्वावर पाण्याच्या वापराचा हक्क/प्राधिकार धारण करणाऱ्या व्यक्तीस त्या हंगामासाठी किंवा वर्षासाठी उपलब्ध करून द्यावयाचा, पाण्याच्या वापराच्या प्राधिकाराचा/हक्काचा हिस्सा किंवा टक्केवारी, असा आहे ;

(ग) "प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, असा आहे ;

(घ) "मंडळ'' याचा अर्थ, कलम १५ अन्वये घटित करण्यात आलेले राज्य जल मंडळ असा आहे ;

(ङ) "मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क'' याचा अर्थ, एखाद्या पाणी प्रकल्पाद्वारे, नदीच्या पाण्याद्वारे किंवा पाण्याच्या साठ्याच्या सुविधेद्वारे, वापराच्या विशिष्ट प्रवर्गाकरिता (प्रकाराकरिता) किंवा प्रवर्गाकरिता, निर्माण केलेले आणि हक्कदारीला मंजुरी देणाऱ्या आदेशामध्ये विनिर्देशपूर्वक तरतूद केल्याप्रमाणे विशिष्ट मुदतीत पुरवावयाचे, भूपृष्ठीय जलसंपत्तीच्या हिश्शासाठीचे घनमापन पद्धतीचे हक्क (Volumetric Entitlement), असा आहे ;

(च)"वापराचा प्रवर्ग'' याचा अर्थ, पाण्याचा वापर घरगुती, कृषी सिंचन, कृषी उद्योग, औद्योगिक किंवा वाणिज्यिक, पर्यावरण, इत्यादींसारख्या निरनिराळ्या प्रयोजनांसाठी करणे, असा आहे, आणि यात विहित करण्यात येतील अशा अन्य प्रयोजनांचा समावेश होतो ;

(छ) "अध्यक्ष'' याचा अर्थ, प्राधिकरणाचा अध्यक्ष असा आहे;

(ज) "परिषद'' याचा अर्थ, कलम १६ अन्वये घटित केलेली राज्य जलपरिषद, असा आहे ;

(झ) "पाण्याची हक्कदारी'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता पाण्याचा वापर करण्यासाठी कोणत्याही नदी-खोरे-अभिकरणाने दिलेले कोणतेही प्राधिकारपत्र, असा आहे ;

(ञ) "शासन'' किंवा "राज्य शासन'' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ट) "राज्यपालांचे निदेश'' म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) नुसार दिलेल्या 'विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, १९९४' मधील नियम ७ अन्वये राज्यपालांचे निदेश;

(ठ) "पाण्याचे व्यक्तिगत हक्क'' याचा अर्थ, मोठ्या प्रमाणात पाण्याचे हक्क किंवा एकूण मोठ्या प्रमाणात पाण्याचे हक्क यांच्याव्यतिरिक्त, पाण्याचा वापर करण्यासाठी प्राधिकरणाने दिलेले कोणतेही प्राधिकारपत्र, असा आहे;

(ड) "एकात्मिकृत राज्य जलसंपत्ती आराखडा'' याचा अर्थ, राज्य जल परिषदेने मान्य केलेला जल संपत्ती आराखडा, असा आहे;

(ढ) "पाटबंधारे प्रकल्प'' म्हणजे वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या अहवाल किंवा आदेशाप्रमाणे असलेल्या लाभक्षेत्रातील जमिनींसाठी सिंचन सुविधा पुरविण्यासाठी बांधण्यात आलेला प्रकल्प ;

(ण) "सदस्य'' याचा अर्थ, प्राधिकरणाचा सदस्य, असा आहे आणि त्यात अध्यक्षाचा समावेश होतो ;

(त) "विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(थ) "विहित प्राधिकारी'' याचा अर्थ, एखाद्या जल यंत्रणेमध्ये वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचा कोटा किंवा प्रमाण, प्राधिकरणाकडून यथोचितरित्या देण्यात आलेल्या पाणी वापराच्या प्राधिकाराच्या नेमून दिलेल्या टक्केवारीनुसार वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर, निर्धारित व घोषित करण्यासाठी, प्राधिकरणाकडून यथोचितरित्या प्राधिकृत करण्यात आलेला, जलसंपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमधील निरनिराळ्या स्तरांवरील कोणताही प्राधिकारी, असा आहे ;

(द) "प्रकल्पस्तरीय गट (एन्टीटी)'' याचा अर्थ, जलसंपत्ती प्रकल्पामधील पाणीपुरवठ्याच्या सामाईक स्त्रोतामधून पाणी घेणाऱ्या सर्व पाणी वापरकर्ता संस्थांचा गट, असा आहे ;

(ध) "कोटा'' याचा अर्थ, पाण्याच्या वापराचा प्राधिकार धारण करणाऱ्यास उपलब्ध करून देण्यात आलेले पाण्याचे घनमापक (व्हॉल्यूमेट्रीक) प्रमाण, असा असून, हे प्रमाण पाण्याच्या वापराचा प्राधिकार, वार्षिक किंवा हंगामी पाणी वाटपाच्या टक्केवारीशी गुणाकार करून काढले जाते ;

(न) "विनियम'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये प्राधिकरणाने तयार केलेले विनियम, असा आहे ;

(प) “नदी-खोरे अभिकरण” याचा अर्थ, नदी-खोऱ्यांमध्ये कार्यरत असलेल्या पुढील नदी-खोरे विकास महामंडळांपैकी कोणतेही एक, असा आहे ; आणि त्यात, शासनाने, वेळोवेळी, विनिर्दिष्ट केलेल्या पुढील शासकीय प्राधिकरणांचा समावेश होतो, —

१९९६ चा महा.१५. (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ ;

१९९७ चा महा.२६. (२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ ;

१९९८ चा महा.३. (३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ;

१९९८ चा महा.४. (४) महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले तापी पाटबंधारे विकास महामंडळ ;

१९९८ चा महा.२३. (५) महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ अन्वये स्थापन करण्यात आलेले गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ ;

(फ) “निवड समिती” याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेली निवड समिती, असा आहे ;

(ब) “राज्य” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(भ) “राज्य जल नीती” याचा अर्थ, राज्याची जल नीती असा आहे ;

(म) “उप-खोरे” याचा अर्थ, राज्यातील नदी-खोऱ्याचे जलविद्याविषयक युनिट व जलविद्याविषयक उप-युनिट, असा आहे ;

(य) “भूजलाचा हक्क” याचा अर्थ, पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील नलिकाकूप, विंधण विहीर किंवा इतर विहिरींमधून किंवा भूजल उपसावयाच्या अन्य कोणत्याही मार्गाने उपसावयाच्या पाण्याचा घनमापकाच्या (व्हॉल्यूमेट्रीक) प्रमाणावरील व्यक्तिगत किंवा एकत्रित हक्क किंवा प्राधिकरणाने विहित केलेल्या मानकांना अनुसरून, यथोचितरित्या आणि कायदेशीरपणे परवानगीने दिलेली, नोंदणी केलेले आणि बांधलेले शेताचे गट किंवा विहिरी, असा आहे;

(यक) “जलसेवा” याचा अर्थ, घरगुती किंवा नगरपालिकेसाठी पाणीपुरवठ्याचे ( उद्योगासाठी वापरावयाच्या पाण्यासह ) व्यवस्थापन प्रक्रिया आणि वितरण यांकरिता जबाबदार असलेला कोणताही पाणी वापर गट, असा आहे ;

(यख) “घनमापक” याचा अर्थ, भारतीय मानक-ब्युरोच्या मानकानुसार आकारमानाशी संबंधित पाण्याचे मोजमाप ;

(यग) “पाणी वापर गट” याचा अर्थ, प्राधिकरणाने पाण्याचा हक्क प्राप्त करण्यासाठी व वापरण्यासाठी प्राधिकृत केलेली कोणतीही पाणी वापर संस्था, जलसेवा, औद्योगिक पाणी वापर संस्था, अन्य पाणी वापर संस्था किंवा इतर कोणताही गट, असा आहे ;

(यघ) “पाणी वापर संस्था” याचा अर्थ, कोणत्याही प्रकल्पाच्या, कालव्याच्या किंवा नैसर्गिक प्रवाहाच्या किंवा साठ्याच्या यंत्रणेच्या भागामधून सिंचन पाण्याची वापरकर्त्यांची, प्रतिनिधी असलेली वितरिका स्तरावर किंवा त्यावरील स्तरावर स्थापन करण्यात आलेली एखादी पाणी वापर संस्था, असा आहे ;

(२) या अधिनियमात वापरलेले आणि व्याख्या न केलेले परंतु राज्यातील विविध पाटबंधारे किंवा जलसंपत्ती यांच्याशी संबंधित अधिनियमांमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या त्या अधिनियमांत ते अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

प्राधिकरण स्थापन करणे व कायद्याने संस्थापित करणे.

**३.** (१) राज्य शासन, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण नावाचे एक प्राधिकरण स्थापन करील. हे प्राधिकरण या अधिनियमाखाली त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि नेमून दिलेली कामे व कर्तव्ये पार पाडील.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण हे अखंड परंपरा व सामाईक मोहोर असलेला उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल त्याला संविदा करणे, स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादित करणे, धारण करणे व त्यांची विल्हेवाट लावणे आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे याबाबतचा अधिकार असेल, आणि त्याच्या निगम नावाने त्याला वाद दाखल करता येईल किंवा त्याच्याविरुध्द वाद दाखल करता येईल.

(३) प्राधिकरणाचे मुख्यालय मुंबई येथे असेल.

(४) प्राधिकरण, अध्यक्ष आणि दोन अन्य सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

(५) प्राधिकरणाचा अध्यक्ष व अन्य सदस्य हे, कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीनुसार, महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून नियुक्त करण्यात येतील.

प्राधिकरणाचा अध्यक्ष, अन्य सदस्य व विशेष निमंत्रित याच्या नियुक्तीसाठी अर्हता.

**४.** (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष, अन्य सदस्य व विशेष निमंत्रित हे, पुढीलप्रमाणे नियुक्त करण्यात येतील :—

(क) अध्यक्ष हा, सेवानिवृत्त मुख्य सचिव किंवा त्याला समतुल्य अशा दर्जाची व्यक्ती आहे किंवा पूर्वी तशी असलेली व्यक्ती असेल ;

(ख) एक सदस्य, जलसंपदा अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ असेल ;

(ग) एक सदस्य, जलसंपदा अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ज्ञ असेल ;

(घ) प्राधिकरणाला धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यास सहाय्य करण्याकरिता प्रत्येक नदी खोरे अभिकरणाच्या क्षेत्रातून एक याप्रमाणे विहित केल्यानुसार पाच विशेष निमंत्रित जे अभियांत्रिकी, शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, वित्तव्यवस्था किंवा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित समस्यांचे पुरेसे ज्ञान, अनुभव असलेले किंवा त्यासंबंधातील क्षमता शाबीत केलेली असेल, असे असतील.

(२) प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य, दुसरे कोणतेही पद धारण करणार नाही.

निवड समिती गठित करणे व तिची कार्ये.

**५.** (१) राज्य शासन, कलम ३ च्या पोट-कलम (५) च्या प्रयोजनांसाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील सदस्यांची मिळून बनलेली एक निवड समिती घटित करील :—

| | | |
|---|---|---|
| (क) राज्याचा मुख्य सचिव | .. | पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ख) सचिव, नियोजन विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) सचिव (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण), जलसंपदा विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) सचिव, जलसंधारण विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |

(ङ) सचिव, पाणीपुरवठा विभाग .. पदसिद्ध सदस्य ;

(च) सचिव, नगरविकास विभाग .. पदसिद्ध सदस्य ;

(छ) सचिव, ऊर्जा आणि पर्यावरण विभाग .. पदसिद्ध सदस्य ;

(ज) सचिव, कृषी विभाग .. पदसिद्ध सदस्य ;

(झ) सचिव, जलसंपदा विभाग .. पदसिद्ध सदस्य-सचिव.

(२) शासन, अध्यक्षाच्या वा कोणत्याही सदस्याच्या मृत्यूमुळे, राजीनाम्यामुळे किंवा त्याला पदावरून काढून टाकल्यामुळे कोणतेही पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आणि अध्यक्ष वा कोणताही सदस्य सेवानिवृत्त होण्याच्या किंवा त्याचा पदावधी समाप्त होण्याच्या सहा महिने अगोदर, ते रिक्त पद भरण्यासाठी निवड समितीकडे निर्देशित करील.

(३) निवड समिती, पोट-कलम (२) अन्वये तिला ज्या दिनांकाला निर्देशित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, अध्यक्ष व सदस्य यांची निवड निश्चित करील.

(४) निवड समिती, तिच्याकडे निर्देशित केलेल्या प्रत्येक रिक्त पदासाठी दोन नावाच्या नामिकेची शिफारस करील.

(५) प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा अन्य सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची शिफारस करण्यापूर्वी, अशा व्यक्तीचे, सदस्य म्हणून तिच्या कार्यावर बाधक रीतीने परिणाम करू शकतील असे कोणतेही आर्थिक वा इतर हितसंबंध नाहीत, याबद्दल निवड समिती स्वत:ची खात्री करून घेईल.

(६) निवड समितीमध्ये कोणतेही पद रिक्त आहे एवढ्याच कारणावरून अध्यक्षाची वा अन्य सदस्याची कोणतीही नियुक्ती विधिअग्राह्य ठरणार नाही.

प्राधिकरणाचा अध्यक्ष आणि सदस्य याचा पदावधी, वेतन व भत्ते आणि इतर सेवाशर्ती.

**६.** (१) अध्यक्ष वा अन्य सदस्य, आपल्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या अवधीसाठी पद धारण करील :

परंतु, अध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांना पुनर्नियुक्त करता येईल परंतु, लागोपाटच्या दोन मुदतींपेक्षा अधिक मुदतीकरिता पुनर्नियुक्ती करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणताही अध्यक्ष वा अन्य सदस्य सत्तर वर्षे वयाचा झाल्यावर धारण केलेल्या पदावर राहणार नाही.

(२) अध्यक्षाला आणि अन्य सदस्यांना देय असणारे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, विहित केल्याप्रमाणे असतील.

(३) अध्यक्ष आणि अन्य सदस्य यांच्या नियुक्तीनंतर, त्यांचे वेतन व भत्ते आणि इतर सेवाशर्ती यांमध्ये, त्यांना अहितकारक होईल अशा प्रकारे बदल करण्यात येणार नाही.

(४) अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य, आपल्या पदावर रुजू होण्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने आणि अशा प्राधिकाऱ्यासमोर पदग्रहणाची व गोपनीयतेची शपथ घेईल.

(५) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्यास,-

(क) राज्यपालांना, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल एवढ्या मुदतीची लेखी नोटीस देऊन आपले पद सोडता येईल; किंवा

(ख) कलम ७ च्या तरतुदींनुसार त्याच्या पदावरून काढून टाकता येईल.

(६) अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य या नात्याने पद धारण करण्याचे बंद करणारी व्यक्ती,-

(क) तिने असे पद धारण करण्याचे बंद केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील दुसरी नोकरी करण्यास पात्र असणार नाही;

(ख) तिने असे पद धारण करण्याचे बंद केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी कोणतीही वाणिज्यविषयक नोकरी स्वीकारणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(एक) "शासनाच्या अखत्यारितील नोकरी" यामध्ये, महाराष्ट्र राज्यक्षेत्रामधील किंवा शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही स्थानिक किंवा इतर प्राधिकरणातील किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही महामंडळातील किंवा संस्थेतील नोकरीचा समावेश होतो.

(दोन) "वाणिज्यविषयक नोकरी" याचा अर्थ जलसंपत्ती क्षेत्रातील व्यापारविषयक, वाणिज्यविषयक, औद्योगिक किंवा वित्तीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीकडे कोणत्याही पदावर अथवा तिचे अभिकरण म्हणून केलेली नोकरी, असा आहे आणि त्यात कंपनीचा संचालक किंवा भागीदारी संस्थेचा भागीदार यांचा समावेश होतो, तसेच त्यामध्ये एकतर स्वतंत्रपणे किंवा भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणून किंवा सल्लागार किंवा समंत्रक म्हणून प्राधिकरणाच्या कामाच्या संबंधातील कोणताही व्यवसाय सुरू करण्याचा समावेश होतो.

सदस्यास काढून टाकणे.

**७.** (१) पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, याबाबतीत विहित केलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून चौकशी केल्यावर, राज्य शासनाने कोणत्याही सदस्यास, गैरवर्तन सिद्ध झाल्याच्या कारणावरून काढून टाकणे भाग असल्याचे कळविल्यानंतर, प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्यास अशा गैरवर्तन सिद्ध झाल्याच्या कारणावरून राज्यपालांच्या आदेशाद्वारे, त्याच्या पदावरून काढून टाकण्यात येईल.

(२) राज्यपालांना, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्याची चौकशी सुरू असल्याच्या कालावधीमध्ये, अशा सदस्यास निलंबित करता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा अध्यक्ष किंवा यथास्थिति, इतर सदस्य,—

(क) नादार म्हणून घोषित करण्यात आलेला असेल; किंवा

(ख) शासनाच्या मते, नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल सिद्धापराध ठरला असेल; किंवा

(ग) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून कार्य करण्यास शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या असमर्थ झाला असेल; किंवा

(घ) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्याच्या कामावर बाधक रीतीने परिणाम करू शकतील असे आर्थिक किंवा अन्य हितसंबंध त्याने प्राप्त केले असतील ; किंवा

(ङ) त्याचे त्या पदावर असण्याचे पुढे चालू राहणे हे जनहिताच्या दृष्टीने बाधक ठरेल अशा रीतीने त्याने त्याच्या पदाचा गैरवापर केला असेल;

तर, राज्यपालांस अशा अध्यक्षास किंवा इतर कोणत्याही सदस्यास आदेशाद्वारे, पदावरून काढून टाकता येईल.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाकडून याबाबतीत विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीला अनुसरून शासनाने केलेल्या चौकशीत, शासनाने, सदस्यास अशा कारणावरून किंवा कारणांवरून दूर करणे भाग आहे असे कळविले असल्याखेरीज, कोणत्याही सदस्यास, खंड (घ) किंवा (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरून, त्याच्या पदावरून दूर करण्यात येणार नाही.

**८.** (१) प्राधिकरणास, अध्यक्षाच्या नियंत्रणाखाली, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करण्यासाठी व अशी कर्तव्ये पार पाडण्यासाठी, सचिवाची नियुक्ती करता येईल. प्राधिकरणावर अधिकारी व कर्मचारी यांना प्रतिनियुक्त करण्याचे शासनाचे अधिकार आणि त्यांच्या सेवाशर्ती.

(२) प्राधिकरणास, शासनाच्या पूर्वमान्यतेने त्याची कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा संख्येत अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(३) सचिव, अधिकारी आणि कर्मचारी यांना देय असणारे वेतन व भत्ते आणि त्यांच्या इतर सेवाशर्ती, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) शासनास, प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची व कर्मचाऱ्यांची, प्राधिकरणावर प्रतिनियुक्तीवर नेमणूक करता येईल.

(५) अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा प्राधिकरणावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी पाच वर्षांचा असेल, मात्र पदोन्नती, पदावनती, सेवासमाप्ती किंवा नियत सेवावधीपूर्ती किंवा प्रतिनियुक्तीचे इतर कोणतेही कारण अशा कारणांवरून अशा कोणत्याही व्यक्तीस परत बोलविणे आवश्यक असेल तेव्हा, त्याला राज्य शासनाच्या सेवेत परत बोलवले जाईल :

परंतु, अशा प्रतिनियुक्तीच्या कालावधीमधील, प्रतिनियुक्तीवर असलेल्या व्यक्तींचे वेतन, रजा, भत्ते, निवृत्ती, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व सेवेच्या इतर शर्ती यासंबंधातील सर्व बाबी महाराष्ट्र नागरी सेवा नियम किंवा राज्य शासन, वेळोवेळी, करील असे इतर नियम याद्वारे विनियमित केल्या जातील.

(६) प्राधिकरणाच्या प्रतिनियुक्तीवरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा, कोणत्याही प्रतिनियुक्ती भत्त्याचा हक्कदार असणार नाही.

(७) प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते प्राधिकरणाकडून देण्यात येतील.

(८) या कलमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, प्राधिकरणाच्या प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्याच्या सेवेच्या अटी व शर्ती या त्यांना प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी लागू असणाऱ्या सेवेच्या अटी व शर्ती पेक्षा कमी लाभधारक असणार नाहीत आणि त्यांमध्ये राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय त्यांना अहितकारक होईल असे कोणतेही बदल करण्यात येणार नाहीत.

(९) प्राधिकरणास, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा अटी आणि शर्तींवर, प्राधिकरणाची कामे पार पाडण्याच्या कामी त्याला सहाय्य करण्यासाठी आवश्यक असलेले सल्लागार नियुक्त करता येतील.

**९.** (१) प्राधिकरण, अध्यक्ष निदेश देईल अशा वेळी मुख्यालयात किंवा त्याच्या कोणत्याही कार्यालयात बैठक घेईल आणि आपल्या बैठकीच्या कामकाजाच्या संबंधात (तिच्या बैठकीच्या गणपूर्तीसह), विनियमांद्वारे, निर्धारित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील. प्राधिकरणाचे कामकाज.

(२) अध्यक्ष, किंवा तो प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर त्याने याबाबतीत

नामनिर्देशित केलेला इतर कोणताही सदस्य आणि असे नामनिर्देशन केलेले नसल्यास, किंवा कोणताही अध्यक्ष नसेल अशा बाबतीत, उपस्थित सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला कोणताही सदस्य, बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

(३) प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीसमोर मांडण्यात आलेल्या सर्व प्रश्नांवर, उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास, अध्यक्षास किंवा अध्यक्षपद भूषविणाऱ्या व्यक्तीस दुसरे किंवा निर्णायक मत देण्याचा हक्क असेल.

(४) पोट-कलम (३) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त प्रत्येक सदस्यास एक मत असेल.

(५) प्राधिकरणाचे सर्व आदेश आणि निर्णय, सचिवाकडून किंवा अध्यक्षाने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या, प्राधिकरणाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून, अधिप्रमाणित करण्यात येतील.

रिक्त जागा इत्यादींमुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

**१०.** प्राधिकरणाने केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ प्राधिकरणामधील कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा प्राधिकरणाच्या रचनेत दोष असल्याच्या कारणावरून विवादास्पद किंवा विधिअग्राह्य ठरविली जाणार नाही.

## प्रकरण तीन

## **प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये**

प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये.

**११.** प्राधिकरण पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्य पार पाडील :—

(क) विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, विविध प्रवर्गातील पाणी वापराच्या हक्कांचे वितरण आणि वापराच्या प्रत्येक प्रवर्गामधील पाणी वापराच्या हक्कांचे समन्यायी तत्त्वांवर वितरण निर्धारित करणे ;

(ख) या अधिनियमाखाली निर्धारित केलेले निर्णय किंवा आदेश अंमलात आणणे ;

(ग) पाणी टंचाईच्या काळात जलसंपत्ती प्रकल्प, उपखोरे आणि नदी-खोरेस्तरांवर, उपलब्ध असलेल्या पाण्याच्या समन्यायी वितरणाचे प्राधान्य निर्धारित करणे ;

(घ) प्रत्येक नदी खोऱ्यातील लाभार्थींच्या किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करून घेतल्यानंतर, सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर (जल प्रशुल्क) पद्धती ठरविणे आणि उप-खोरे, नदी-खोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरविणे ;

(ङ) राज्यातील नद्यांच्या पाणीपुरठ्याबाबत आंतरराज्यीय पाणीवाटपाचे प्रशासन व व्यवस्थापन करणे ;

(च) एखादा प्रस्ताव हा, एकात्मीकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याशी सुसंगत आहे, तसेच तो आर्थिक, जलशास्त्रीय व पर्यावरणीय क्षमतेच्या दृष्टीनेही सुसंगत आहे आणि जेथे प्रस्तुत असेल तेथे तो आंतरराज्यीय हक्कदारीचा अंतर्भाव असलेल्या, न्यायाधिकरणाच्या करारनाम्यांनुसार किंवा हुकूमनाम्यांनुसार राज्याच्या बांधिलकीशी सुसंगत आहे, याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, उप-खोरे, आणि नदी-खोरे स्तरांवरील प्रस्तावित जलसंपत्ती प्रकल्पांचा आढावा घेणे व त्यांना मान्यता (Clearance) देणे :

परंतु, नदी-खोरे अभिकरणांनी प्रस्तावित केलेल्या, बांधकाम करावयाच्या नवीन जलसंपत्ती प्रकल्पांना संबंधितांकडून मान्यता देताना, प्राधिकरण, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी गुंतवणुकीला अग्रक्रम देण्यासंबंधात, राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे पालन होत असल्याबद्दल खात्री करील :

परंतु , आणखी असे की, राज्यपालांचे निर्देशानुसार विदर्भ व मराठवाड्यातील अशा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळास असतील ;

(छ) पाण्याची हक्कदारी, देण्याचे निकष निश्चित करणे आणि त्याचे संनियंत्रण करणे. या निकषामध्ये, इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबींचा देखील समावेश होतो,—

(एक) पाण्याची हक्कदारी, नदी-खोरे अभिकरणाकडून पाणी वापराच्या प्रवर्गाच्या आधारे, आणि राज्य जलनीती अन्वये अशा पाण्याच्या वापरासाठी अभिहस्तांकित केलेल्या प्राधान्यास आधीन राहून देण्यात येईल;

(दोन) मोठ्या प्रमाणावरील पाण्याची हक्कदारी, नदी-खोरे अभिकरणाकडून, सिंचन पाणीपुरवठा, ग्रामीण पाणीपुरवठा, नगरपालिका पाणीपुरवठा किंवा उद्योगासाठी पाणीपुरवठा याकरिता, नगरपालिका, पाणी वापर संस्था, औद्योगिक पाणी वापरकर्ते व संबंधित क्षेत्राला किंवा भूजल पाणी वापर संस्था किंवा भूजलाचे बहुविध नलिकाकूप, विंधण विहिरी किंवा इतर विहिरी यांचे, बहुविध वापरकर्त्यांच्या वतीने प्रचालन करणाऱ्या इतर संस्था यांना वितरण करण्यास जबाबदार असणाऱ्या राज्य अभिकरणांना देण्यात येईल ;

(तीन) सिंचनासाठीच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावरील हक्कदारी नदी-खोरे अभिकरणाकडून प्राथमिक घटक स्तरावरील, वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांना आणि कालवा किंवा प्रकल्पस्तरीय संस्थांना वितरित करण्यात येईल आणि नदी-खोरे अभिकरणांना हक्कदारी प्राप्त होणार नाही परंतु, पाणी वापर संस्थेला दिलेल्या हक्काच्या पाण्याच्या प्रमाणासाठी अभिहस्तांतरण संस्था म्हणून ते कार्य करील ;

(चार) हक्कधारकांच्या गटाच्या वतीने एकूण हक्कदारांची व्यवस्था करणारे पाणी वापर गट (एन्टीटी), तसेच पाणी वापर संस्था यांना एकूण हक्काच्या पाण्याचे एकत्रित प्रमाण देण्यात येईल ;

(पाच) व्यक्तिगत पाण्याचे हक्क हे, भूपृष्ठजल संपत्ती, विंधण विहिरी, कूपनलिका किंवा इतर सुविधा मधून भूजलाच्या उत्खननासाठी फक्त वैयक्तिक उपसा जलसिंचन योजनांच्या बांधकामाकरिता व कार्यान्वयनाकरिता नदी-खोरे अभिकरणाला देता येतील. अशा हक्कांचे प्रशासन, नोंदणी, मोजणी व संनियंत्रण संबंधित नदी-खोरे अभिकरणाकडून संबद्ध शासकीय अभिकरणाशी योग्य समन्वय साधून करण्यात येईल. जेथे अशी सुविधा, खोऱ्यातील भूपृष्ठजलाशी संयुक्त असलेले पुळणीच्या जलप्रस्तरातील पाणी काढण्याची असेल तेथे, अशा हक्कांचे वितरण व कार्यान्वयन याचा, खोऱ्यातील भूपृष्ठजल संपत्तीचा वापर व प्राप्ती यांच्याशी संयुक्तपणे समन्वय साधता येईल व ते स्थानिक क्षेत्र व संबंधित नदी-खोरे यांच्या एकूण जलसंपत्ती योजनेशी व भूजल संपत्तीच्या प्रमाणित वापराशी सुसंगत असेल ;

(सहा) मोठ्या प्रमाणावरील पाण्याची हक्कदारी ही, प्रवाहाचे विशिष्ट प्रमाण, साठवण किंवा जलसंपत्तीचे किंवा सुविधेचे वार्षिक प्राप्तीचे इतर निर्धारण यासाठी असेल आणि ती हक्कदारी, घनमापन पद्धतीने मापन केलेली व पाणी सोडण्याची वेळ व पाणी सोडण्याच्या प्रवाहाचे प्रमाण यांच्याशी संबंधित असेल ;

(सात) जलनिस्सारण खोरे किंवा नदी-खोरे यातील प्रत्येक प्रकारच्या हक्कांखाली उपलब्ध असलेल्या पाण्याच्या टक्केवारीचे वितरण, विशिष्ट खोऱ्याशी संबंधित जलविद्या व इतर संबंधित परिमिती (Parameters) याच्या आधारे नदी-खोरे अभिकरणे व पाणी वापर संस्था यांच्याकडून संयुक्तपणे निर्धारित करण्यात येईल. या वितरणाचा त्या विशिष्ट वर्षात किंवा चालू हंगामात प्रत्येक हक्कदारीअन्वये उपलब्ध करून द्यावयाच्या पाण्याच्या प्रमाणाचे निर्धारण करण्यासाठी विनियोग करता येईल ;

(ज) राज्यातील भूजल व भूपृष्ठजल यांचे अपवाहन, साठवण व वापर यांसाठी हक्कदारांमध्ये फेरबदल करण्यासाठी निकष घालून देणे. या निकषामध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल,—

(एक) मोठ्या प्रमाणात पाणी मिळण्याचा एकूण हक्क हा या अधिनियमाच्या तरतुदींखालील मोठ्या प्रमाणात पाणी मिळण्याचा हक्क असल्याचे समजण्यात येईल व तो फलोपभोग हक्क या स्वरूपाचा नसेल आणि मोठ्या प्रमाणात पाणी मिळण्याच्या एकूण हक्काचा भाग असेल अशा, कोणत्याही मोठ्या प्रमाणातील पाण्याच्या घटक हक्कामध्ये या अधिनियमाअन्वये भरपाई देणारा बदल होणार असेल तरच प्राधिकरणाकडून तो समायोजित करण्यात येईल ;

(दोन) कोणत्याही पाणी वापर गटाची कोणत्याही पाणीविषयक हक्काच्या वापरात किंवा परिमाणात बदल करण्याचा महा आदेश देण्यासाठी आपल्या प्रवर्ग प्राथम्यतेचा वापर करण्याची इच्छा असेल, तर त्या गटाने, पाणीविषयक हक्कांतर्गत पाणी संधारणासाठी कार्यक्षमता वाढविण्यासाठी व आपली पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी केलेले त्याने सर्व प्रयत्न करून झाले आहेत आणि मुक्त अर्थव्यवस्थेअंतर्गत हस्तांतरणाद्वारे तिच्या पाणीविषयक हक्कात वाढ करण्याच्या सर्व संधी आजमावून पाहण्यात आल्या आहेत असे प्राधिकरणापुढील जाहीर सुनावणीत सप्रमाण प्रतिपादित केले पाहिजे. जर अशा जाहीर सुनावणीनंतर, प्राधिकरणास, असे महादिष्ट हस्तांतरण एकतर वार्षिक तत्त्वावर किंवा कायम तत्त्वावर करणे, राज्यातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने कायदेशीर आणि आवश्यक आहे असे वाटल्यास, ते प्राधिकरण, महादेश वापरकर्त्या प्रवर्ग प्राथम्यतेचा वापर करणाऱ्या गटाकडून पाणी हक्कदारांना द्यावयाची रास्त व न्याय भरपाई जलसंपत्तीच्या बाजार मुल्यानुसार ठरविण्यात आल्याप्रमाणे निर्धारित करील ;

(झ) पाणी वापराचा हक्कदार असणाऱ्याने वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर पाणी वापराचा हक्क किंवा कोटा यांची विक्री करण्याबाबतचे निकष निश्चित करणे. या निकषांमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबींचा समावेश होईल,—

(एक) एकूण मोठ्या प्रमाणातील पाण्याच्या हक्कांव्यतिरिक्त, इतर हक्क, एखाद्या बाजार यंत्रणेमध्ये वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर, ज्यांचे हस्तांतरण, विनिमय खरेदी किंवा विक्री करता येईल आणि ज्यांचे प्राधिकरणाच्या नियमांन्वये स्थापित करण्यात आल्याप्रमाणे प्राधिकरणाकडून नियमन व नियंत्रण करण्यात येऊ शकेल असे फलोपभोग हक्क असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) हंगामी किंवा वार्षिक वाटपाद्वारे निर्धारित केलेला, पाण्याच्या हक्कदारांना नेमून देण्यात आलेला पाण्याचा कोटा म्हणजे प्राधिकरणाच्या नियमांद्वारे स्थापन आणि नियंत्रित करण्यात आल्याप्रमाणे एखाद्या बाजार यंत्रणेमध्ये वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर ज्यांचे हस्तांतरण, विनिमय, खरेदी किंवा विक्री करता येईल असे घनमापन पद्धतीने फलोपभोग हक्क असतील ;

(तीन) मोठ्या प्रमाणात पाण्याचे हक्क किंवा कोटा हे त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या विनिर्दिष्ट जलसंपत्ती सुविधांच्या कार्यचालनाशी सुसंगत असेतोपर्यंत वापराच्या प्रवर्गाअंतर्गत हस्तांतरण योग्य असतील. अशा वार्षिक हस्तांतरणाचे व्यवस्थापन व नोंदणी ही संबंधित नदी खोरे अभिकरणाकडून करण्यात येईल व अशी प्रस्तावित हस्तांतरणे सुविधेच्या कार्यचालनाशी सुसंगत नसतील किंवा यंत्रणेतील पाण्याच्या हक्कदारांना किंवा इतर वापर करणाऱ्यांना नुकसानकारक असतील तर, अशी प्रस्तावित हस्तांतरणे मान्य करण्याचा किंवा नाकारण्याचा त्याला अधिकार असेल. नदी-खोरे अभिकरणास, अशा हस्तांतरणाची प्रक्रिया व नोंदणी करण्यासाठी नाममात्र शुल्क आकारता येईल. परंतु अशा हस्तांतरणाचा भाग म्हणून पाण्याच्या हक्कधारकांमधील कोणत्याही नुकसानभरपाईमधील वाटा उचलता येणार नाही ;

(ञ) पाणीविषयक हक्क, तीन वर्षांहून कमी नसेल एवढ्या कालांतराने त्यांचे पुनर्विलोकन केले जाण्याच्या शर्तीस अधीन असतील आणि त्यानंतर वाटप पातळीच्या वर्धनक्षमतेबद्दल/टिकाऊ क्षमतेबद्दल संबंधितांकडून अधिपत्र देण्यात आल्यास, फक्त त्यांचे पुनर्विलोकन केले जाईल ;

(ट) मोठ्या प्रमाणातील पाण्याच्या हक्कांची नोंद, नदी खोरे अभिकरणाकडून करण्यात येईल आणि त्याचे संनियंत्रण प्राधिकरणाकडून किंवा त्याने रितसर प्रतिनियुक्त केलेल्या सक्षम प्रतिनिधीकडून करण्यात येईल ;

(ठ) पाणीविषयक हक्कांचे स्थायी/कायमस्वरूपी हस्तांतरण हे, त्या त्या नदी-खोरे अभिकरणाच्या व प्राधिकरणाच्या मान्यतेने आणि या प्रयोजनार्थ, प्राधिकरणांच्या प्रख्यापित केलेल्या नियमांचे अनुपालन करून करण्यात येईल. मान्यता दिलेल्या सर्व हस्तांतरणाची नोंद ही प्राधिकरणाच्या पाणीविषयक हक्कांच्या नोंदणी शाखेत करण्यात येईल ;

(ड) पाणी टंचाईच्या प्रसंगी, प्राधिकरण, अशा टंचाईच्या निवारणासाठी, त्याच्या धोरणाचे व नियमांचे अनुपालन करून, सर्व पाणी हक्कदारांना उपलब्ध करून द्यावयाच्या पाण्याच्या परिमाणाचे समायोजन करील आणि नदी-खोरे अभिकरणांच्या मान्यतेनुसार वापरकर्ते आणि वापरकर्त्यांचा प्रवर्ग यांच्यामध्ये पाणीविषयक हक्कांच्या तात्पुरत्या हस्तांतरणाला परवानगी देईल ;

(ढ) भूपृष्ठीय व भूगर्भीय पाण्यासह राज्यातील जलसंपत्तीसाठी विनियामक यंत्रणा प्रस्थापित करणे, या पाण्याच्या वापराचे विनियमन करण्यासाठी, पाणी वापर करणाऱ्या प्रवर्गादरम्यान राज्यातील पाण्याच्या वापरासाठीच्या हक्काचे संविभाजन करणे ;

(ण) प्रमाण आणि प्रकार या दोन्ही दृष्टीने केलेला पाण्याचा प्रत्यक्ष वापर हा प्राधिकरणाने दिलेल्या पाणी वापराच्या हक्काला अनुसरून असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी, पाणी वापरासाठीच्या हक्कांची अंमलबजावणी, संनियंत्रण व मोजमाप करणारी यंत्रणा प्रस्थापित करणे ;

(त) राज्य आणि इतर राज्ये यांच्यामध्ये, आंतर-राज्य पाण्याचे संविभाजन करण्याच्या दृष्टीने, राज्यावर असलेल्या आबंधनाचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी राज्य जल नीतीशी सुसंगत असलेल्या पद्धतीने राज्यांतर्गत जलसंपत्तीचा वापर व हक्क लागू करणे ;

(थ) पाण्याचा दक्षतेने वापर करण्यास चालना देणे आणि त्याचा अपव्यय टाळणे आणि पाणी वापराच्या प्रत्येक प्रवर्गासाठी पाण्याच्या वाजवी वापराचे निकष ठरवून देणे ;

(द) राज्यातील जल व्यवस्थापनाचे कायमस्वरूपी प्रचालन व परिरक्षण तसेच वितरणव्यवस्था यांना कोणत्याही प्रकारे धोका पोहोचू नये याची खातरजमा करण्यासाठी विविध प्रकारच्या वापरांकरिता शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही अंतर्गत अर्थसहाय्य आणि अशा अर्थसहाय्यातून किंवा शासकीय निधीतून नियमित पुरवला जाणारा निधी यांचा मेळ घातला जाईल याची सुनिश्चिती करणे ;

(ध) राज्यांतर्गत पाणी वापरासाठी दिलेले सर्व हक्क, हक्कांचे कोणतेही हस्तांतरण, व त्या हक्कांच्या परिणामी करण्यात आलेला पाणीपुरवठा आणि पाण्याचा वापर यांची स्पष्ट नोंद करील अशी, राज्य पाणी वापरासंबंधीची आधारसामग्री निर्माण करणे ;

(न) नदी-खोरे अभिकरणाच्या सहकार्याने जल-हवामानविषयक माहितीची सर्वसमावेशक अशी आधारसामग्री विकसित करणे, तिचे जतन करणे व प्रसार करणे यासाठी सुविधा उपलब्ध करणे व त्याची सुनिश्चिती करणे ;

(प) प्राधिकरण, दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करील ;

(फ) प्राधिकरण, शासनामार्फत दर वर्षी सिंचन स्थिती दर्शक अहवाल प्रसिद्ध होईल याची सुनिश्चिती करेल. उक्त अहवालात प्रामुख्याने सिंचनाशी निगडीत सर्व आकडेवारीसह जिल्हानिहाय निर्माण झालेली सिंचन क्षमता व प्रत्यक्ष झालेले सिंचन यांचा तपशील असेल ;

(ब) विहित करण्यात येतील असे इतर अधिकार, कार्य व कर्तव्ये.

**१२.** (१) प्राधिकरण, राज्य जल नीतीच्या चौकटीमध्ये राहून काम करील. प्राधिकरणाची सर्वसाधारण धोरणे.

(२) प्राधिकरण, राज्य जल नीतीनुसार नदी-खोरे अभिकरणांना अधिकार प्रदान करण्याच्या धोरणास मान्यता देईल.

(३) प्राधिकरण, राज्य जल नीतीनुसार, राज्यासाठी एक सर्वसमावेशक जल-हवामानशास्त्रीय माहिती यंत्रणा राबवण्यासाठी सर्व संबद्ध राज्य अभिकरणांशी समन्वय साधील.

(४) प्राधिकरण, राज्य जल नीतीनुसार राज्यभर, पाण्याचे सुयोग्य संधारण व व्यवस्थापन करण्याच्या पद्धतीचे प्रचालन व अंमलबजावणी करील.

(५) प्राधिकरण, संबंधित राज्य अभिकरणांशी निकट समन्वय साधून राज्यातील पाण्याच्या दर्जात वाढ करण्यासाठी व त्यांचे जतन करण्यासाठी पाठिंबा देईल व सहाय्य करील. असे करतांना. " प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी " हे तत्त्व वापरण्यात यावे.

(६) प्रकल्प, उप खोरे, खोरेस्तरावर पाणीवापराचा कोटा प्राधिकरण पुढील तत्त्वाच्या आधारावर ठरवेल :-

(क) प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात पाण्याचे समन्यायी वाटप होण्यासाठी लाभक्षेत्रातील प्रत्येक जमीनधारकास पाणी वापराचा कोटा दिला जाईल;

(ख) पाणीवापराचा कोटा लाभक्षेत्रातील जमिनीच्या क्षेत्रावर आधारित असेल :

परंतु, तुटीच्या वर्षात लाभक्षेत्रातील जमीनधारकांना शक्यतो किमान एक एकर जमिनीसाठी पाणी वापराचा कोटा दिला जाईल ;

(ग) खोऱ्यातील पाण्याची तूट समप्रमाणात विभागली जावी यासाठी खोऱ्यातील सर्व धरणातील पाणीसाठे दरवर्षी ऑक्टोबर अखेर अशा तऱ्हेने नियंत्रित केले जातील की, वर्षातील वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याची (खरीप वापरासहीत) टक्केवारी सर्व धरणासाठी जवळजवळ सारखी राहील ;

(घ) अस्तित्त्वात असलेल्या खाजगी उपसा सिंचनाचे व्यवस्थापन, पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याच्या अटीवर, पाच वर्षे चालू ठेवण्यात येईल. त्यानंतर शासन विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून कलम १४(४) मधील तरतुदी लागू होतील :

परंतु असे की, वेगवेगळ्या क्षेत्राकरिता भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळे दिनांक अधिसूचित करता येतील ;

(ङ) हा अधिनियम अस्तित्त्वात येण्याच्या दिनांकास असलेले खाजगी उपसा सिंचन योजनांचे लाभक्षेत्र पाटबंधारे प्रकल्पांच्या अधिसूचित लाभक्षेत्राशी समकक्ष गणले जाईल.

(७) पुच्छ ते शीर्ष सिंचन (tail to head irrigation) हे तत्त्व नदी-खोरे अभिकरणाकडून राबविले जाईल याची खातरजमा प्राधिकरण करेल.

(८) प्राधिकरण महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ चे अनुपालन करेल. १९९३ चा महा. २८.

(९) प्राधिकरण धोरण ठरवितांना राज्यपालांच्या निदेशान्वये निर्मुलन करावयाच्या आर्थिक अनुशेषाला आधारभूत असलेला भौतिक अनुशेष संपुष्टात येईल अशा प्रकल्पांना प्राधान्य व वरचे प्राथम्य देईल.

(१०) (क) राज्यातील अवर्षणप्रवण भागास पाणी उपलब्ध करण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील राहील ;

(ख) अवर्षणप्रवण जिल्ह्यासाठी उपलब्ध होणारा निधी प्राथम्याने त्या जिल्ह्यातील वंचित राहिलेल्या अवर्षणप्रवण भागात खर्च होईल याची खातरजमा प्राधिकरण करील.

(११) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीस दोनपेक्षा जास्त मुले असतील त्या व्यक्तीस, कृषि सिंचनासाठी पाण्याची हक्कदारी मिळविण्याकरिता कलम ११ च्या खंड (घ) अन्वये ठरविण्यात आलेल्या सर्वसाधारण पाणीपट्टी दराच्या दिडपट पाणीपट्टी भरावी लागेल :

परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती अशा प्रारंभाच्या दिनांकास त्या व्यक्तीला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीस दिडपट पाणीपट्टी भरावी लागणार नाही. :

परंतु आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या पोट-कलमात नमूद केलेल्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण.** - या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ -

(क) त्यावेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(ख) "मूल" या संज्ञेत, दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.

प्राधिकरणाचे अधिकार व विवाद सोडविणारा अधिकारी.

**१३.** या अधिनियमान्वये करावयाच्या कोणत्याही चौकशीच्या किंवा सुरू करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी, प्राधिकरणास व विवाद सोडविणाऱ्या अधिकाऱ्यास, पुढील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे निहित केले असतील असे अधिकार असतील, - १९०८ चा ५.

(क) कोणत्याही साक्षीदारास उपस्थित राहण्यास सांगणे व उपस्थित होण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे;

(ख) पुरावा म्हणून सादर करावयाचा कोणताही दस्तऐवज किंवा इतर महत्त्वपूर्ण वस्तू शोधून काढणे व ती सादर करणे;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी राजादेश देणे ;

(च) आपले निर्णय, निदेश व आदेश यांचे पुनरीक्षण करणे ;

(छ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

## प्रकरण चार

## राज्य जल नियोजन

**१४.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, कोणत्याही व्यक्ती, संबंधित नदी-खोरे अभिकरणाकडून पाण्याचे हक्क मिळविल्याशिवाय कोणत्याही जल संपत्तीमधील कोणत्याही पाण्याचा वापर करणार नाही : नदी-खोरे अभिकरणाची परवानगी.

परंतु,—

(क) घरगुती प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारी कोणतीही विंधण विहीर, नलिका विहीर किंवा इतर विहीरी ; आणि

(ख) तलाव, लहान जलाशये किंवा प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल अशा वार्षिक उत्पन्न क्षमतेची, पावसाच्या पाण्यावर शेती करणारी पाणलोट क्षेत्र यांच्या बाबतीत पाण्याचे हक्क आवश्यक असणार नाहीत.

**स्पष्टीकरण.** - या कलमाच्या प्रयोजनार्थ "व्यक्ती" या शब्दप्रयोगामध्ये, व्यक्ती, व्यक्तींचे गट, सर्व स्थानिक प्राधिकरणे, संघटना, संस्था, कंपन्या इत्यादींचा समावेश असेल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास लाभक्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या विंधन विहिरी, नलिका विहिरी किंवा इतर विहिरी मधून होणारा शेतीच्या प्रयोजनासाठीचा पाणीवापर प्राधिकरण निर्धारित करेल अशा दिनांकापर्यंत अबाधित राहील.

(३) प्राधिकरण निर्धारित करेल अशा दिनांकापर्यंत प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये विंधण विहिरी, नलिका विहिरी व इतर विहिरी खोदण्यावर कोणतेही बंधन असणार नाही.

(४) निर्धारित केला जाईल अशा भागातील बारमाही पिकांना निर्धारित केला जाईल अशा दिनांकापासून, ठिबक सिंचन. तुषार सिंचन अथवा प्राधिकरणाने मान्यता दिलेले अन्य पाण्याची बचत करणारे तंत्र वापरल्याखेरीज कालव्यामधून पाणी दिले जाणार नाही. या बचतीमधून भविष्यातील वाढीव पिण्याच्या पाण्याची मागणी भागवून शिल्लक राहिलेले पाणी लाभक्षेत्रातील तसेच लगतच्या भागात समन्यायी तत्त्वावर वाटप करण्यात येईल.

**१५.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य जल मंडळ म्हणून संबोधण्यात येणारे एक मंडळ **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घटित करील. राज्य जल मंडळ.

(२) मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :-

(क) राज्याचा मुख्य सचिव .. .. पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) प्रधान सचिव, नियोजन विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(ग) प्रधान सचिव, वित्त विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(घ) सचिव, जलसंधारण विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(ङ) सचिव, पाणीपुरवठा विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(च) सचिव, नगरविकास विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(छ) सचिव, ऊर्जा व पर्यावरण विभाग .. पदसिद्ध सदस्य ;

(ज) सचिव, कृषी विभाग .. .. पदसिद्ध सदस्य ;

(झ) सर्व विभागीय आयुक्त .. .. पदसिद्ध सदस्य ;

(ञ) सचिव, जलसंपदा विभाग (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण) .. .. पदसिद्ध सदस्य ;

(ट) सचिव, जलसंपदा विभाग .. .. पदसिद्ध सदस्य सचिव.

(३) मंडळ, नदी-खोरे-अभिकरणांकडून तयार करण्यात व सादर करण्यात आलेल्या खोरे आणि उप-खोरेनिहाय जल योजनांच्या आधारावर एकात्मीतकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याचे प्रारूप तयार करील.

(४) मंडळ, राज्यामध्ये हा अधिनियम लागू करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, एकात्मीकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याचे तयार केलेले पहिले प्रारूप मान्यतेसाठी परिषदेला सादर करील.

(५) मंडळ, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेले एकात्मीकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याचे प्रारूप तयार करताना, राज्य जल नीतीची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेईल.

(६) मंडळाची बैठक मंडळाचा अध्यक्ष ठरवील अशा वेळी व अशा ठिकाणी होईल आणि ती मध्ये, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरण्यात येईल.

राज्य जल परिषद

**१६.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य जल परिषद म्हणून संबोधण्यात येणारी एक परिषद **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घटित करील.

(२) परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :-

| | | |
|---|---|---|
| (क) मुख्यमंत्री | .. | .. पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ख) उप मुख्यमंत्री | .. | .. पदसिद्ध उपाध्यक्ष ; |
| (ग) मंत्री, जलसंपदा | .. | .. पदसिद्ध उपाध्यक्ष ; |
| (घ) मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ). | | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) मंत्री, कृषी विभाग | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (च) मंत्री, जलसंधारण | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) मंत्री, पाणीपुरवठा | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) मंत्री, वित्त व नियोजन | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (झ) मंत्री, नगरविकास | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ञ) मंत्री, उद्योग | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ट) मंत्री, पर्यावरण | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ठ) मंत्री, (मराठवाडा प्रदेशाचा प्रतिनिधी) | | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ड) मंत्री, (विदर्भ प्रदेशाचा प्रतिनिधी) | | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ढ) मंत्री, (उर्वरित महाराष्ट्राचा प्रतिनिधी) | | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (ण) राज्यमंत्री, जलसंपदा विभाग | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (त) राज्यमंत्री, जलसंपदा विभाग (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ). | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (थ) सचिव, जलसंपदा विभाग | .. | .. पदसिद्ध सदस्य ; |
| (द) सचिव, (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण), जलसंपदा विभाग. | | .. पदसिद्ध सदस्य सचिव. |

(३) मुख्यमंत्री, पोट-कलम (२) च्या अनुक्रमांक (ठ), (ड) व (ढ) वरील परिषद सदस्य, कॅबिनेट मंत्र्यांमधून नामनिर्देशित करील.

(४) परिषद, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी राज्यपालांनी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन, एकात्मिकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याचे प्रारूप सादर केल्याचा दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, मंडळाने सादर केलेल्या एकात्मीकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याच्या प्रारूपाला आवश्यक वाटतील अशा फेरफारांसह, मान्यता देईल. परिषदेने, जल योजनेला अशी मान्यता दिलेला जल संपत्ती आराखडा " एकात्मिकृत राज्य जलसंपत्ती आराखडा " म्हणून ओळखण्यात येईल.

(५) परिषदेने एकात्मीकृत राज्य जलसंपत्ती आराखड्याला मान्यता दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर त्याचे पुनर्विलोकन करता येईल.

(६) परिषदेचा अध्यक्ष ठरवील अशावेळी व ठिकाणी परिषदेची बैठक होईल आणि तीमध्ये विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरण्यात येईल.

## प्रकरण पाच

## लेखे, लेखापरीक्षा आणि अहवाल

**१७.** या संदर्भात राज्य विधानमंडळाकडून कायद्याद्वारे यथोचितरित्या विनियोजन करण्यात आल्यानंतर प्राधिकरणाला या अधिनियामाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी आणि कर्तव्याचे पालन करण्यासाठी, राज्य शासनास, त्याला आवश्यक वाटतील असे अनुदान व आगाऊ रकमा प्राधिकरणास देता येतील ; आणि हे सर्व अनुदान व आगाऊ रकमा या, राज्य शासन निर्धारित करील अशा अटी व शर्तीवर देण्यात येतील. प्राधिकरणाला अनुदान व आगाऊ रकमा देणे.

**१८.** प्राधिकरण, आपल्या अंदाजित जमा रकमा व खर्च दाखविणारा पुढील वित्तीय वर्षासाठीचा आपला अर्थसंकल्प विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि प्रत्येक वित्तीय वर्षातील अशा वेळी तयार करील, आणि तो शासनाकडे पाठवील. प्राधिकरणाचा अर्थसंकल्प.

**१९.** (१) प्राधिकरण, योग्य लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि शासन महालेखापालाशी विचार-विनिमय करून, विहित करील अशा नमुन्यात, लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील. प्राधिकरणाचे लेखे.

(२) महालेखापाल त्याने स्वत: विहित केलेल्या कालांतराने, प्राधिकरणाच्या लेख्याची लेखापरीक्षा करील, आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात कोणताही खर्च करण्यात आला असल्यास तो प्राधिकरणाकडून महालेखापालाला देय असेल.

(३) महालेखापाल आणि या अधिनियमान्वये प्राधिकरणाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात त्यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांना महालेखापालाला शासनाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात सर्वसाधारणपणे जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात, तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषत: प्राधिकरणाच्या वह्या, लेखे संबंधित प्रमाणके आणि अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा तसेच त्याच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(४) महालेखापालाने किंवा या संदर्भात त्यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले प्राधिकरणाचे लेखे, त्यांवरील लेखापरीक्षा अहवालासह प्राधिकरणाकडून दरवर्षी राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील आणि राज्य शासन लेखापरीक्षा अहवाल मिळाल्यानंतर सहा महिन्यांत तो राज्य विधानमंडळापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

**२०.** (१) (क) प्राधिकरण, प्रत्येक वर्षातून एकदा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी, मागील वर्षातील आपल्या उपक्रमांचा सारांश देणारा वार्षिक अहवाल तयार करील आणि त्या अहवालाच्या प्रती राज्य शासनाला पाठविण्यात येतील. प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल.

(ख) अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष, जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पद्धतीने अद्यावत माहिती उपलब्ध असलेला अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर दरवर्षीच्या महाराष्ट्रच्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल.

(ग) अद्यावत माहिती उपलब्ध असलेला आलीकडील वर्षापर्यंत वर्षवार तसेच एकूण व त्यानंतर दरवर्षी पाटबंधारे या विकास क्षेत्रासाठी करण्यात आलेला जिल्हानिहाय व विभागनिहाय खर्च नमूद असलेले दूसरे परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल.

(घ) तथापि राज्यपालाने अनुशेषाबाबत वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे उपरोक्त (ख) व (ग) मधील तपशिलात बदल करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये मिळालेल्या अहवालाची प्रत, ती मिळाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.

## प्रकरण सहा

## राज्यपालांचे निदेशानुसार अनुशेष निर्मूलनार्थ विशेष तरतुदी

प्राधिकरणाची विशेष जबादारी.

**२१.** (१) राज्यातील पाटबंधारे क्षेत्रामध्ये राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेषग्रस्त अशा जिल्ह्याच्या व विभागाच्या बाबतीत प्राधिकरण विशेष जबाबदारी पार पाडील.

(२) राज्यपालांच्या निदेशाचे पालन होण्यासाठी राज्यामध्ये जलसंपदा विभागाकडे उपलब्ध आहे त्या मनुष्यबळाकडून अनुशेषग्रस्त भागात प्रकल्पाचे सर्वेक्षण, नियोजन, तपशिलवार संकल्पन करून अनुशेष निर्मूलनार्थ नवीन प्रकल्प वेळेत बांधकामासाठी उपलब्ध होतील असे प्राधिकरण पाहील.

## प्रकरण सात

## संकीर्ण

विवाद व अपील.

**२२.** (१) राज्य शासन, या संदर्भात दिलेल्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे, या अधिनियमाखाली पाण्याचे हक्क देण्याच्या किंवा त्याचे वितरण करण्याच्या संदर्भातील विवाद मिटविण्यासाठी, प्राथमिक विवाद निवारण अधिकारी म्हणून प्रत्येक नदी-खोरे अभिकरणाकरिता, विहित केल्यानुसार कोणताही एक किंवा अनेक सक्षम अधिकारी प्राधिकृत करील.

(२) प्राथमिक विवाद निवारण अधिकारी, विवादावर सुनावणी करतेवेळी, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील.

(३) प्राथमिक विवाद निवारण अधिकाऱ्याच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल :

परंतु, व्यथित व्यक्तीला साठ दिवसांच्या उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते, याबद्दल जर प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, प्राधिकरणास साठ दिवसांचा उक्त कालावधी समाप्त झाल्यावर, ते अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(४) प्राधिकरण, अपिलांवर सुनावणी करतेवेळी, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील.

शासनाकडून निदेश.

**२३.** (१) शासनास, लोकहितार्थ धोरणाच्या बाबतीत प्राधिकरणाला लेखी स्वरूपात सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करणे व त्यानुसार कार्य करणे, प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

(२) असा कोणताही निदेश लोकहितार्थ धोरणाच्या बाबीसंबंधात आहे किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

प्राधिकरणाचे सदस्य,अधिकारी आणि इतर कर्मचारी लोकसेवक असणे.

**२४.** प्राधिकरणाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी हे, जेव्हा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या वा विनियमांच्या कोणत्याही तरतुदीनुसार कार्य करीत असतील अथवा कार्य करीत असल्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, ते, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**२५.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या वा विनियमांच्या तरतुदींनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, शासन किंवा प्राधिकरण किंवा शासनाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरणाचा कोणताही सदस्य, अधिकारी वा इतर कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणताही वाद, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

या अधिनियमाखालील आदेशांचे अनुपालन न करण्याबद्दल शिक्षा.

**२६.** जी व्यक्ती, या अधिनियमाखाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे वा निदेशाचे उक्त आदेशात वा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अवधीत पालन करण्यात कसूर करील किंवा या अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या नियमांच्या वा विनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, प्रत्येक अपराधाच्याबाबतीत सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा वार्षिक पाणीपट्टीच्या दहा पटीपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**२७.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे कंपनीचा प्रभार होता आणि जी, कंपनीचे कामकाज चालविण्यास कंपनीस जबाबदार होती. अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु , अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केला असेल, आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा नेमका अर्थ निगम निकाय असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा—मग ती विधिसंस्थापित असो वा नसो—समावेश होतो ;

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

अपराध आपसात मिटविणे.

**२८.** (१) प्राधिकरणाला, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासंबंधातील कार्यवाही सुरू होण्यापूर्वी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या मान्यतेने, अशा अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधांसाठी असलेल्या दंडाच्या कमाल रकमेपेक्षा कमी नसेल आणि दंडाच्या कमाल रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम स्वीकारता येईल.

(२) प्राधिकरणाकडून, किंवा राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून पोट-कलम (१) अन्वये निश्चित करण्यात येईल अशा रकमेचा भरणा केल्यावर, त्या अपराधाच्या बाबतीत आरोपी व्यक्तीविरूद्ध आणखी कोणतीही कार्यवाही चालविण्यात येणार नाही, आणि कोणतीही कार्यवाही आधीच चालू असल्यास किंवा सुरू केली असल्यास, ती समाप्त होईल, आणि आरोपी व्यक्ती अभिरक्षेत असली तर तिला सोडून देण्यात येईल.

अपराधाची दखल.

**२९.** प्राधिकरण किंवा या प्रयोजनासाठी प्राधिकरणाने यथोचितरित्या प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी यांच्याकडून लेखी तक्रार आल्याशिवाय, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही.

नियम करण्याचा शासनाचा अधिकार

**३०.** (१) राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशाप्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन, समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल ; किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

विनियम करण्याचे प्राधिकरणाचे अधिकार

**३१.** (१) प्राधिकरणास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, या अधिनियमाखाली विनियमाद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता, आणि प्राधिकरणाच्या मते, सर्वसाधारणपणे या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्याकरिता आणि त्याची कार्ये पार पाडण्याकरिता ज्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे अशा इतर सर्व बाबींकरिता, हा अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

(२) प्राधिकरणाने राज्य शासनाच्या मान्यतेने, विनियम तयार करीपर्यंत, प्राधिकरण, आपली कार्ये पार पाडण्याकरिता, जलसंपदा विभाग अनुसरित असलेल्या नियम आणि कार्यपद्धतीचे, योग्य त्या फेरफारांसह, अनुसरण करील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३२.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

* **संचालक,**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२/२३६३२६९३ व २३६३०६९५,
  २३६३११४८, २३६३४०४९.

* **व्यवस्थापक,**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे - ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०/२६१२५८०८, २६१२४७५९.

* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर - ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२/२५६२६१५.

* **सहायक संचालक,**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार,
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०/२३३१४६८, २३३१५२५.

* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर - ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१/२६५०३९५, २६५०४०२.

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते.**